Shanti Education Society's
# A. G. Patil Polytechnic Institute, Solapur
18 (2/2A) / 2, Pratap Nagar, Opp. S.R.P. Camp, Vijapur Road, Solapur- 413 008
Ph.No. - 0217 - 2341899, 6450740 Fax No. - 0217 - 2342220
www.agppi.com Email : agppi.contact@rediffmail.com

दि. १०.०३.२०१७

## सुचना

### संदर्भ : तंशिविक्रपु / विवि / २०१७ / ९११, दि. ०८.०३.२०१७

सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाद्वारे जागतिक तापमानामधील वाढ व ऋतुबदल या पार्श्वभूमीवर आणि राज्यातील वनक्षेत्र २०% वरून ३३% पर्यंत नेण्याचा भाग म्हणून वृक्षारोपणाची गती तुटू न देता, त्यामध्ये सातत्य ठेवावे असा निर्णय घेऊन त्यानुसार पुढील तीन वर्षात ५० कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठरविण्यात येऊन सदर उद्दिष्ट पूर्ती करिता लोकसहभाची गरज असल्याने "महाराष्ट्र हरित सेना" स्थापित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सदर संदर्भिय परिपत्रकाद्वारे समजले.

त्याअनुषंगाने "महाराष्ट्र हरित सेना" चे greenarmy.mahaforest.gov.in हे संकेत स्थळ निर्माण करण्यात आले असून सदर संकेत स्थळावर शुक्रवार, दि. ३१.०३.२०१७ पर्यंत सभासद नोंदणी करता येणार असून सदर सभासदांना वृक्ष लागवड, संगोपन, वन व वन्यजीव आणि वन विभागातील संबंधित क्षेत्रांमध्ये आपले योगदान देता येणार आहे. तसेच या उपक्रमात उत्तम काम करणाऱ्या सभासदांना बक्षीस योजना व इतर सवलतीद्वारे सन्मानित करण्याची योजना शासनाच्या विचाराधीन आहे. यांमूळे आपण सर्वांनी वरील संकेत स्थळावर आपली सभासद नोंदणी करून अशा लोकोपयोगी कार्यात आपला सहभाग नोंदवावा; अशी शासनाच्या वतीने आपणा सर्वांना महाविद्यालयाद्वारे आवाहन करण्यात येते.

प्राचार्य
Principal
A. G. Patil Polytechnic Institute
Solapur.

टिप : सदर नोंदणीनंतर ई मेलद्वारे प्राप्त प्रमाणपत्र महाविद्यालयाच्या कार्यालयात जमा करावे.

प्रत :
1) CE 2) CO 3) EJ 4) IF

# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६
फोन (020)25656234 ईमेल:ropune.dte@gmail.com संकेतस्थळ :www.ropune.org.in

जा.क्र. तंशिविकापु/विवि/२०१७/911

दिनांक : 08 MAR 2017

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित संस्था,
पुणे विभाग.

विषय :- वन विभागाच्या महाराष्ट्र हरित सेना योजनेच्या संकेत स्थळावर सदस्य नोंदणी करण्याबाबत

संदर्भ :- १.तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.१६/आस्था/संकीर्ण/२०१७/६१ दिनांक ०७.०३.२०१७

२.मा.मंत्री महसूल व वन विभाग यांचे सचिव (वने)यांचे अर्ध शासकीय पत्र क्र.सावदी-२०१६/प्र.क्र.१३३/फ-११ दिनांक २१.०१.२०१७

३.मा.मंत्री वित्त आणि नियोजन ,वने यांचे पत्र क्र. मंत्री/वि.नि.व वने /नॉट/१३१ दिनांक ३१.०१.२०१७

उपरोक्त विषय व संदर्भानुसार जागतिक तापमानातील वाढ आणि ऋतुबदल या पार्श्वभूमीवर आणि राज्यातील वनक्षेत्र २०% वरून ३३% पर्यंत नेण्याचा भाग म्हणून,वृक्षारोपणाची गती तुट्‌ न देता,त्यामध्ये सातत्य ठेवावे,असा निर्णय शासनाने घेतलेला आहे.त्यानुसार पुढील तीन वर्षात ५० कोटी वृक्षारोपणाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

नियोजित ५० कोटी वृक्षारोपणाचा व संगोपनाचा कार्यक्रम लोकसहभागाद्वारे जन चळवळीत रुपांतरीत करून यशस्वीरित्या राबविण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोकांनी सहभागी होणे गरजेचे आहे. यासाठी "महाराष्ट्र हरित सेना "स्थापित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य म्हणून नोंदणी करण्यासाठी greenarmy.mahaforest.gov.in या संकेत स्थळाची निर्मिती करण्यात आली आहे. या संकेत स्थळावर दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत किमान १ कोटी लोकांनी ,स्वयंस्फूर्तीने स्वयंसेवक म्हणून या उपक्रमाचे सदस्य म्हणून नोंदणी करावी असे अपेक्षित आहे. ग्रीन आर्मीचे सदस्य असलेल्या सभासदांना वृक्ष लागवड,संगोपन,वन व वन्यजीव आणि वन विभागातील संबंधित क्षेत्रांमध्ये आपले योगदान देता येईल. तसेच या उपक्रमात उत्तम काम करणा-या सभासदांना बक्षीस योजनाव इतर सवलतीद्वारे सन्मानित करण्याची योजना विचाराधीन आहे.

नोंदणीची पद्धत अत्यंत सोपी असून वर नमूद संकेतस्थळावर आवश्यक माहिती भरल्यानंतर सभासद नोंदणी झाल्याचे आणि त्यानुसार प्रमाणपत्र सिस्टीममध्ये तयार होऊन सध्याच्या मेल आयडीवर आणि एसएमएसवर पाठविले जाईल. तरी आपण सदर पत्र आपल्या संस्थेतील सर्व कर्मचारी,अधिकारी व विद्यार्थ्यांच्या नजरेस आणून देऊन त्यांना महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य नोंदणी करण्याबाबत आवाहन करावे व या लोकोपयोगी कार्यात आपला सहभाग नोंदवावा.

To, O.S.
Pl. inform to all staff through HOD to register on above website
10.3.17

सहसंचालकाकरिता
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे